जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२८/०१/२०२४
## दि.२८/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१८/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४/२०२४,भादविक ३०७,३८५,३२४,५०४,५०६,१४३,१४७,१४८,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३५ वर्षे,रा.स.न.३०/२,रामवाडी नगररोड,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे इतर ०९ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०१/२०२४ रोजी १८/३० वा.मालपानी ग्रुप,विमाननगर,एअरपोर्ट रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी त्यांचे कंपनीचा पार्टनर शेवराव यादव यास मालपाणी ग्रुपचे काम फिर्यादी यांचे कंपनीला मिळाल्याच्या रागातुन ते काम यातील नमुद आ.क्र.१ यास करायचे आहे अन्यथा काम करायचे असेल तर पैसे/माथाडी दयावी लागेल असे बोलून,फिर्यादी यांना खंडणीची मागणी करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या कामाची ऑर्डर दाखवण्यासाठी दबाव टाकला,त्यास त्यांनी विरोध केल्याचा राग मनात धरून,आ.क्र.१ याने त्याचे इतर साथीदार यांना बोलावून घेवुन यांनी माझ्या धंद्यावर पाय आणले आहेत आज यांना जिवंत सोडत नाही असे म्हणुन लोखंडी रॉडने फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे डोक्यात मारुन, त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी फिर्यादी यांचे उजव्या हाताला मार लागला आहे. तसेच इतरांनी दगडाने तसेच हाताने मारहाण करुन शिवीगाळ करून,फिर्यादी व शेवराव यादव यास जखमी करुन पुन्हा मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दत्तत्रय नांगरे ९८२३१७९००२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४५/२०२४,भादविक ३०७,३२६,३२४,३३७,३२३,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | सनी ढिल्लोड,वय-३२ वर्षे,रा.सिध्दार्थनगर,रामवाडी,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०१/२०२४ रोजी १८/०० वा. मालपाणी बिल्डरच्या साईटवर,विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सोबत विकास चव्हाण, रवीशिंदे,सुशील चव्हाण यांचेसह बिल्डरच्या साईटवर लोडिंग / अनलोडिंगचे कामासाठी विचारणा करण्यासाठी गेले असता,त्याठिकाणी यातील नमुद इसमांनी तु कोण आम्हाला विचारणारा,तु काय इथला भाई आहे का असे बोलुन,फिर्यादीस शिवीगाळ करून,माझ्या धंदयाच्या आड येतो का,आता मी तुला जिवंत सोडत नाही असे म्हणुन फिर्यादीस धक्का देवुन,खाली पाडुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे डोक्यात दगड घालत असताना,त्यांनी हात मध्ये घातला असता त्यांचे उजव्या हाताला दुखापत करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर सदर इसमांनी फिर्यादी यांना थांब कुठे पळतो,आज तुला खल्लास करतो असे बोलून,फिर्यादी व त्यांचे सहकारी रवी शिंदे, गणेश ढिल्लोड यांना हाताने मारहाण व दगडाने मारहाण करून जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे कारवर दगडाने मारुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. स्वप्नाली गायकवाड ७७०९१३०९१७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**